पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव.
'नियमित जनसंपर्क'विभाग,
दुरध्वनी क्रंमाक-8007269000
ईमेल नं.-jansampark.osd@gmail.com

'नियमित प्रसिध्दी पत्रक'(प्रेस नोट)' शनिवार' दि.24.10.2026

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.23 ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण 151 कारवाया करुन 1,43,500 ₹'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

" अवैध मद्य विरोधी कारवाई."

नळदुर्ग पोलीस ठाणे: आरोपी नामे-प्रताप उर्फ पवन महादेव जाधव, वय 20वर्षे, रा. बौध्दनगर नळदुर्ग ता. तुळजापूर ह.मु. जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.23.10.2026 रोजी 11.30 वा. सु. अंदाजे 2,000 ₹ किंमतीची 20 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तामलवाडी पोलीस ठाणे: आरोपी नामे-तोळाबाई धनाजी शिंदे, वय 55 वर्षे, रा. सांगवी काटी जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.23.10.2026 रोजी 17.00 वा. सु. सांगवी काटी बसस्टॉपचे जवळ अंदाजे 900 ₹ किंमतीची 9 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

" जुगार विरोधी कारवाई."

तामलवाडी पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान तामलवाडी पोलीसांनी दि.23.10.2026 रोजी 14.30 वा. सु. तामलवाडी पोलीस ठाणे हद्दीत वडाचे झाडाखाली देवकुरुळी येथे छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-बबन विठोबा हजारे, वय 69, नागनाथ लक्ष्मण नवगिरे, वय 60 वर्षे,कोंडीबा दगडू राउत, वय 56 वर्षे, दाजी किसन पोपळकर, वय 52 वर्षे, रा. देवकुरुळी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे 14.30 वा. सु. वडाचे झाडाखाली देवकुरुळी येथे तिरट मटका जुगाराचे साहित्य सह मोबाईल फोन असा एकुण 1,450 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तामलवाडी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-12 (अ) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

" मालमत्तेविरुध्द गुन्हे."

तुळजापूर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-ऋषीकेश विठ्ठल धावारे, वय 24 वर्षे, रा. सिध्दार्थ नगर तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे 45,000₹किंमतीची मोटरसायकल क्र एमएच 25एझेड 2625 ही दि.22.10.2026 रोजी 18.50 ते 19.25 वा. सु. सुवर्णेश्वर मंदीराचे पाठीमागे भाजी मंडई तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-ऋषीकेश धावारे यांनी दि.23.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तुळजापूर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-प्रकाश तुकाराम सिताफळे, वय 70 वर्षे, रा. 134 बूधवारपेठ मिलींदनगर सोलापूर ता.जि. सोलापूर यांची अंदाजे 40,000₹किंमतीची मोटरसायकल क्र एमएच 13 डीसी 7847 ही दि.10.10.2026 रोजी 20.00 ते 21.00 वा. सु. तहसिल कार्यालय तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रकाश सिताफळे यांनी दि.23.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे

तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"मारहाण."

कळंब पोलीस ठाणे :आरोपी नामे-फेरोज पाशा बागवान, रा. परळी बायपास रोड कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.22.10.2026 रोजी 17.00 वा. सु चोंदे देशी दारु दुकानाचे समोर कळंब येथे फिर्यादी नामे- शुभम कल्याण साळवे, वय 30 वर्षे, रा. भिमनगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांना नमुद आरोपीने दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याचे कारणावरुन जातीवाचक शिवीगाळ करुन लोखंडी कड्याने मारहाण करुन जखमी केले. तु जर मला इथुन पुढे प्यायला पैसे दिले नाही तर तुला जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शुभम साळवे यांनी दि.23.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे कळंब येथे भा.न्या.सं.कलम 118(1), 352, 351(2) सह अ.जा.ज.अ. प्र.अधि. कलम 3(1)(आर),3(1)(एस), 3)2)(व्हिए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"रस्ता अपघात."

नळदुर्ग पोलीस ठाणे : फिर्यादी जखमी नामे-संगमेश बस्वराज बेलुरे, वय 33 वर्षे, रा. 1518 सुभाष चौक बसवकल्याण ता. बसवकल्याण जि. बिदर कर्नाटक व सोबत मयत नामे- गुरुसिध्दप्पा बाबु कुंभार, वय 31 वर्षे, सुभाष चौक बसवकल्याण ता. बसवकल्याण जि. बिदर कर्नाटक, जखमी नामे- विरेश हणमंत कुंभार, विरेश रुद्रमणी चौधरी, रोहन दशरथराव हंचाटे, महादेव रामलींगय्या मठपती सर्व रा. सुभाष चौक बसवकल्याण ता. बसवकल्याण जि. बिदर कर्नाटक,मडीवाळप्पा चंद्रकांत जमादार रा. तिपरांत ता. बसवकल्याण असे दि.23.10.2026 रोजी 08.30 वा. सु.पायी चालत जात होते. दरम्यान एनएच 65 बायपास रोडने मुर्टा साठवण तलावाचे सांडव्यावरील ब्रिज पास करुन रोडच्या डाव्या साईडला कंटेनर क्र एमएच 04 एनबी 9671 चा चालक आरोपी नामे-देवेंद्र लेढा चौव्हाण, रा. घटबेहटी ता. जि. बदायु उत्तर प्रदेश यानी त्याचे ताब्यातील कंटेनर हा हायगयी व निष्काळजीपणे चालवून गुरुसिध्दप्पा कुंभार व इतर जखमी यांना धडक दिली. या अपघातात गुरुसिध्दप्पा कुंभार हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- संगमेश बेलुरे यांनी दि.23.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम 281, 125(ए), 125(बी), 106(1) सह 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"लैंगीक अत्याचार."

भुम पोलीस ठाणे : एका गावातील 24 वर्षीय मुलगी (नाव-गावगोपनीय) 2020 दि.19.10.2026 रोजी पावेतो ही तिचे राहते घरी असताना एका गावातील एका तरुणानी तिचे घरी जावून तिचेशी शारिरीक संबध ठेवून त्याचे मोबाईल मध्ये छायाचित्रीकरण करुन व्हायरल करण्याची धमकी देवून लॉजवर घेवून जावून तिचेवर लैगिंक अत्याचार केला. जर येथुन पुढे सांगणेप्रमाणे वागली नाहीस व लग्न करुन धर्म स्विकारला नाहीस तर छायाचित्रीकरण तुझे नातेवाईकांना पाठवून देवून बदनामी करील अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.23.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं. कलम-64(1), 64(2)(एम),69, 318(4), 319, 351(2),78, 79 सह महाराष्ट्र धर्मस्वातंत्र अधिनियमक 2026 कलम 9 अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"आक्समातमृत्यु."

आनंदनगर पोलीस ठाणे : आमृ क्र 51/2026 कलम 194 बी.एन.एस.एस मधील अनोळखी पुरुष वय अंदाजे 40 वर्षे, हा दि. 19.10.2026 रोजी 19.30 वा. सु. उपळा पाटी ते येडशी जाणारे रोडवर मधूबन हॉटेल जवळ शिंगोली शिवार येथे बेशुध्द पडल्याने त्यास सरकारी दवाखाना धाराशिव येथे दाखल केले असता त्यास डॉक्टराने दि.19.10.2026 रोजी 23.00 वा. सु. तपासुन तो मृत अवस्थेत दाखल झाला आहे.तरी सदर अनोळखी पुरुष इसमाचा प्रसिध्दी होणेस विनंती आहे.